म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. 340

REFBK-0019464
REFBK-0019464

लक्ष्मीधर कृत

# स्वैरालाप

REFBK-0019464
REFBK-0019464

प्रकाशक—

**श्रीधर सखाराम पंडित,**

शास्त्रीहॉल, यमुना चाळ,
ग्रांटरोड पोष्ट, मुंबई,
माघ वद्य ९, शके १८४८

Printed by V. P. Pendherkar at the Tutorial Press, 211a, Girgaon
Back Road, Bombay No. 4

and

Published by Shridhar Sakharam Pandit, Shastri Hall, Yamuna Chawl
Grant Road, Bombay, 7.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८०
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## समर्पण

यदंश देती मज थोर जन्म हा ।
श्रीभारतीं **पंडित** सत्कुलीं महा ॥
**राधासखाराम**–पदांबुजांतें ।
हें काव्यकर्तृत्व म्हणोनि जातें ॥ १ ॥

लक्ष्मीधर

# प्रस्तावना

## कोऽहं ?

नेणें मी कविसद्गुणांस धरणें किंवा नसें शाहिर।
विद्वत्ताबहुमानसूचक पदें नामांतिं ना जाहिर।
त्याची नाहिं क्षिती मनास अणुही उत्साह दे अंतरीं।
संकेता करि सुप्रसन्न वरदा श्रीकाव्यदेवी तरी॥ १॥

## के यूयं ?

तुम्ही वाचक नित्य नूतन अशा शास्त्रांसि संपादिलें।
तुम्हीं गायक संगितादि कवना तालींसुरीं गाइलें।
श्रोते हो तुम्हि गद्यपद्यविषयां नानारसीं ऐकिलें।
त्या तुम्हां विबुधां विनम्र हृदयें या वाक्सुमां वाहिलें॥ २॥

## कास्म: ?

आहे काव्यप्रदेश भव्य गमतो येथें कवी थोर ते।
विद्वद्वर्य करींद्र मत्त डुलती त्यांचे मदस्राव ते।
टीकाकार सुभृंग प्राशुनि उठ गुंजाहि दिङ्मंडलीं।
पन्नाशीजवळी सुरम्य अटवीमाजीं पदें ठेविलीं॥ ३॥

हा से,
काव्य नं. 372
9

# स्वैरालाप

## १

## वसुंधरेचा धावा

चालः—( थांब जरासा बाळ )

ये, सुधांशु ये, ॥ ध्रु० ॥
नको तारका जरि लक्षावधि।
येइ बालका पूर्ण कलानिधि।
उचंबळोनी बाहे उदधि।
अचल स्तनाच्या, तरंङ्गिणींच्या, धारा स्वमुखीं घे ॥ १ ॥
तापद रवि अस्तासी जाई।
क्रीडांगण पृथ्वीतल होई।
कुमुद बांधवा येई येई।
शीतलगात्रा, सस्मितवक्त्रा, पाहूं दे, झणिं ये ॥ २ ॥
गाढतमाच्या पदराखालीं।
दृष्टि पहा रे मी ही मिटली।
कुणी बघेना तुज चंदूली।
पशुपक्षांनीं, माना वळवुनि, निद्रेतें वरिलें ॥ ३ ॥
शीतकरांना लांब करूनी।
शशिबिंबातें क्षितिजावरुनी।
हळुच उचलिते मातामेदिनी।
हंसरें बालक, हंसरी जननी, प्रेमा भरती ये ॥ ४ ॥

२

## सुंदोपसुंद

चालः—( वरल्या रानीं, माझी गाय चुकली )

वधू नच वळली, दों वरें प्रार्थना केली ॥ ध्रु० ॥
दोन तटांनीं एक वाहिनी, एका तनुला जीवशिवांनीं,
संध्यारमणी उदयास्तांनीं, पहा ती वरिली ॥ १ ॥
नयनांतेंही दृष्टी भिडली, पदयुगुला स्वीकारी चाली,
दोन करांतें क्रीया रुचली, अशा या वेळीं ॥ २ ॥
सिंधुवायुमधिं नौका मुरके, घनद्वयामधिं विद्युत् चमके,
उभय दलांतरिं तरळा झळके, क्रूर करवाली ॥ ३ ॥
दोन शिंपल्यांमध्यें मुक्ता, दोन बिंदुमधिं रेषाऋजुता,
भक्ति भेटते देवा भक्ता, एक्या काळीं ॥ ४ ॥
दो भूभागीं एकचि सीमा, रविशशिअंकित एक पौर्णिमा,
तसें वरावें त्वांही आम्हां, जिवाचे भूली ॥ ५ ॥

३

## कन्याजन्म

चालः—( वरल्या रानीं, माझी गाय चुकली )

गूढ मायेचें, रंजवी हृदय रसिकांचें ॥ ध्रु० ॥
नरवृक्षासी एकाएकीं । ललनालतिका वेढुन टाकी ।
दुहिताकलिका प्रकट करी कीं । भाग्य सदनाचें ॥ १ ॥
प्रेमोद्भव जी प्रेममंजिरी । स्त्रीपुरुषांतें बंधनकारी ।
प्रमुदित होउनि मन्मथ वितरी । चिन्ह विजयाचें ॥ २ ॥

किंवा कंदर्पानें केली । हृदयमंदिरीं क्रीडा अपुली ।
तीच जणूं आकारा आली । रूप साक्षीचें ॥ ३ ॥
दिनरजिनीची कां ही बाला । उषा उजळिते दिग्भागाला ।
तसें भूषवी उभय कुलांला । जनन कन्येचें ॥ ४ ॥
पुत्रप्राप्ती वांच्छिति सगळे । परि सर्वांतें सहजचि न मिळे ।
खाण तशी हिरकणी आढळे । काय नवलाचें ॥ ५ ॥
वन्हीपासुन दीप्ती निघणें । जलाशयावरी लहरी उठणें ।
पयोधरांतुन धारा स्रवणें । क्रम हे साचे ॥ ६ ॥
दुहिता साधी दोन हितांना । तटिनी निज पति-तात-गृहांना ।
सागर आणि हिमनग यांना । भेटवी नाचे ॥ ७ ॥

## ४

## मूक कृष्णास

चालः—( मज गमे ऐसा जनक तो )

वद मुकुंदा कां मुका ? बोलसी नाऽऽऽ ॥ ध्रु० ॥
गोरस अथवा नवनीताची, नकळत चव घेतली कशाची,
म्हणुनी राधा बोलेनाची, मुळिंच घेइना काय तव मुका ? ॥ १ ॥
मनोहारिणी निज मुरलीनें, गायक खगवृंदास खिजविणें
झालें, तेणें अति त्वेषानें, करी तो चंचुघात तव मुखा ॥ २ ॥
शुभ्र कौमुदी सिताहि सिकता, तटिनितटीं खेळांत रंगतां,
लपवी ना तीं तुझी असितता, म्हणुनि होसि तूं खिन्नवदन कां ? ॥३॥
गोधनवत्सें घरां परतली, कोंडायाची गर्दि उसळली,
त्याहीमध्यें वेणु हरपली, म्हणुनि घाबऱ्या बघसि टकमका ॥ ४ ॥
श्यामातनु मेघासम गमली, तेणें चंचलचपला चळली,
नाथासन्मुख नाचुं लागली, म्हणुनि वृत्तिही होइ तरल का ? ॥५॥

## २

## सुंदोपसुंद

चालः—( वरल्या रानीं, माझी गाय चुकली )

वधू नच वळली, दों वरें प्रार्थना केली ॥ ध्रु० ॥
दोन तटांनीं एक वाहिनी, एका तनुला जीवशिवांनीं,
संध्यारमणी उदयास्तांनीं, पहा ती वरिली ॥ १ ॥
नयनांतेंही दृष्टी भिडली, पदयुगुला स्वीकारी चाली,
दोन करांतें क्रीया रुचली, अशा या वेळीं ॥ २ ॥
सिंधुवायुमधिं नौका मुरके, घनद्वयामधिं विद्युत् चमके,
उभय दलांतरिं तरळा झळके, क्रूर करवाली ॥ ३ ॥
दोन शिंपल्यांमध्यें मुक्ता, दोन बिंदुमधिं रेषाऋजुता,
भक्ति भेटते देवा भक्ता, एक्या काळीं ॥ ४ ॥
दो भूभागीं एकचि सीमा, रविशशिअंकित एक पौर्णिमा,
तसें वरावें त्वांही आम्हां, जिवाचे भूली ॥ ५ ॥

## ३

## कन्याजन्म

चालः—( वरल्या रानीं, माझी गाय चुकली )

गूढ मायेचें, रंजवी हृदय रसिकांचें ॥ ध्रु० ॥
नरवृक्षासी एकाएकीं । ललनालतिका वेढुन टाकी ।
दुहिताकलिका प्रकट करी कीं । भाग्य सदनाचें ॥ १ ॥
प्रेमोद्भव जी प्रेममंजिरी । स्त्रीपुरुषांतें बंधनकारी ।
प्रमुदित होउनि मन्मथ वितरी । चिन्ह विजयाचें ॥ २ ॥

किंवा कंदर्पानें केली । हृदयमंदिरीं क्रीडा अपुली ।
तीच जणूं आकारा आली । रूप साक्षीचें ॥ ३ ॥
दिनरजिनीची कां ही बाला । उषा उजळिते दिग्भागाला ।
तसें भूषवी उभय कुलांला । जनन कन्येचें ॥ ४ ॥
पुत्रप्राप्ती वांच्छिति सगळे । परि सर्वांतें सहजचि न मिळे ।
खाण तशी हिरकणी आढळे । काय नवलाचें ॥ ५ ॥
वन्हीपासुन दीप्ती निघणें । जलाशयावरी लहरी उठणें ।
पयोधरांतुन धारा स्त्रवणें । क्रम हे साचे ॥ ६ ॥
दुहिता साधी दोन हितांना । तटिनी निज पति-तात-गृहांना ।
सागर आणि हिमनग यांना । भेटवी नाचे ॥ ७ ॥

४

## मूक कृष्णास

चालः—( मज गमे ऐसा जनक तो )

वद मुकुंदा कां मुका ? बोलसी ना ऽऽऽ ॥ ध्रु० ॥
गोरस अथवा नवनीताची, नकळत चव घेतली कशाची,
म्हणुनी राधा बोलेनाची, मुळिंच घेइना काय तव मुका ? ॥ १ ॥
मनोहारिणी निज मुरलीनें, गायक खगवृंदास खिजविणें
झालें, तेणें अति त्वेषानें, करी तो चंचुघात तव मुखा ॥ २ ॥
शुभ्र कौमुदी सिताहि सिकता, तटिनितटीं खेळांत रंगतां,
लपवी ना तीं तुझी असितता, म्हणुनि होसि तूं खिन्नवदन कां ? ॥३॥
गोधनवत्सें घरां परतली, कोंडायाची गर्दि उसळली,
त्याहीमध्यें वेणु हरपली, म्हणुनि घाबऱ्या बघसि टकमका ॥ ४ ॥
श्यामातनु मेघासम गमली, तेणें चंचलचपला चळली,
नाथासन्मुख नाचुं लागली, म्हणुनि वृत्तिही होइ तरल का ? ॥५॥

नोहे चपला परि ही राधा, ही घे मुरली घुमवि सुनादा,
नाहीं राज्य तुझें गोविंदा, सोडि मूकपण होइ बोलका ॥ ६ ॥

५

## साध्वीप्रेम

चालः—( जो भेद विधीनें स्त्रीपुरुषीं केला )

जो प्रयाण समयीं शालू शर्वरिला,
लेववी दिवाकर नच प्रिय चंद्राला ॥ १ ॥
होउनी, निशेच्या वस्त्रहरणिं सजला,
हा चंचल पुतळा सरसर वर आला ॥ २ ॥
कीं कंजुष रविनें निधि जो लपवीला,
तो हळूच न्यावया तस्कर अवतरला ॥ ३ ॥
परि कुटिल कर्म तें आकळलें काळा,
कलकलाट करुनी उठवी अरुणाला ॥ ४ ॥
तों सतेज सारथि पाहुनि शशि थिजला,
सति निशा फिरवि मुख धरितां निज पतिला ॥ ५ ॥

६

## मर्मभेद

चालः—( नंदनवनदेवीनें माझा )

अर्धतनू झांकुनी निघाला प्रतिरोधक गगनीं ।
पायघड्या घालिते धराही ज्योत्स्ना पसरूनी ।
"रवितेजातें चोरुनि नटशी नटवीशी रजनी ।"
म्हणतां लज्जित हिमांशु चाले क्षितिजा लक्षूनी ॥ १ ॥

७

ता. 340 ता. 9

## जीव–कुडी संवाद

चालः—( मित्रा तूं कोठें जाशी )

तोः–काये गे सोडी मजला, तव स्नेह पुरेसा झाला ।
मी शरण रिघुन रामाला, झणिं जाइन निजधामाला ।
तीः–कां जातां मजला त्यजुनी, मज कोण तुम्हांवांचूनी ?
नाथ जगतीं या,
नाथ जगतीं या,
मग सोडूं कसें मी वायां ॥ १ ॥
तोः–काये गे मी होवोनी, तुज केली मत्स्वामीनी ।
तें सर्वहि त्वां विसरोनी, कां अडवुन धरिशीं अजुनी ? ।
तीः–मी अडवुन ना कधिं धरित्यें, परि काय करूं नच कळतें ।
एक तुम्हि जातां,
एक तुम्हि जातां,
कृमिकीटक खातिल आतां ॥ २ ॥
तोः–कृमिकीटक खातिल म्हणुनी, कां बसशी मजशी धरुनी ।
परि मोह तुझा भवविपिनीं, मोकलील कीं अडरानीं ।
तीः–गुंतुनियां या भवपाशीं, सुख मेळविलें बहुराशी ।
कीर्ति श्री नारी,
कीर्ति श्री नारी,
दिधल्या किती हे सुविहारी ॥ ३ ॥
तोः–जे भोग सुखाचे गमती, ते दुःखमूळ कीं असती ।
ते क्षणभर केवळ ठरती, म्हणुनियां मला नावडती ।
तीः–प्रिय काय असे हो कांता ? तें कथुनि निवारा चिंता ।

लागत्यें चरणा,
लागत्यें चरणा,
अपुली मी अर्धांगी ना ॥ ४ ॥

तोः-मत्सर्व सुखाचें स्थान, तें वसे पंढरीं जाण ।
वर्णितां तया श्रुतिवचनें, अष्टोत्तर शिणलिं पुराणें ।
तीः-जा, जा हो हरिच्यापायीं, तुमच्या नच आडहि येई ।
जीव तो गेला,
जीव तो गेला,
सोडुनी कुडी धरणीला ॥ ५ ॥

८

## आळसनदिचें तीर

### लावणी

सख्या परिसिली काय तुवां कधि जांभई पेंगापुरी ।
वसविली आळसनदिचे तिरीं ॥ ध्रु० ॥
" थांब जरा रे " फुलें विकसती, " करूं कधितरीं " असा
केवडा घमघमतोही कसा ॥
" काय फायदा " " जाऊं द्या ना " ऊर्मी उठती महा ।
फोडिती निश्चयनौका पहा ॥
" करा चैन रे " " नको उद्यांचा कांच मना किंतु वा " ।
असा हा मंत्र येथिंचा नवा ॥
॥ चाल ॥ त्या मंचककुंजीं सुस्तपणाची उटी ।
त्या मच्छरदाणी वेलीच्या तळवटीं ।
ती कामशिसारी घालि गळयातें मिठी ।

र. नं. ...५३५९

दिरंगाइ तशि कालवंचना ह्याच जणूं पागुरा।
पसरल्या आळसनदिचे तिरा ॥ १ ॥

नटनर्तक गायकगण फौजा नगरीच्या रक्षणा ॥
उद्यमा अटकाविति क्षणक्षणा ॥
पानसुपारी विडितंबाखू गांजा माजुम अफू
व्यग्रताछिद्रा करिती रफू ॥
नशानिशेच्या समयीं उगवे मनोल्हास चंद्रिका।
वारुणीपात्रांच्या तारका ॥
॥ चाल ॥ मग मारि भरारी विचार गगनोदरीं।
निर्लज्जपणानें अनीतिपथ आदरी।
नर श्रांत जाहल्या बेशुद्धीचे दरीं।
करी स्वागता स्वप्नसुखें त्या तारेच्या मंदिरीं।
बांधिलें आळसनदिचे तिरीं ॥ २ ॥

गप्फा चेष्टा गंजीफांच्या पडशाळा बांधिल्या।
करंट्या पांथस्था मानल्या ॥
आत्मश्लाघा परनिंदेचे कोटरिं घूत्कार् बसून्।
घालती दुर्जन उलुकें लपून् ॥
टवाळकीच्या मळ्यांत दिसती दूषण धान्यें पिकून्।
पांखरें नास्तिक पडती झटून् ॥
॥ चाल ॥ तूं सांग सख्यारे कधिं करशिल करणी।
तूं देशहिताची कधिं घेशिल स्मरणी।
कधिं देह ठेवशिल स्वतंत्रतेचे रणीं।
नंद सुनंदन अर्जुनस्यंदन चालक कुरु संगरीं।
जपावा, आळसजल ओसरी ॥ ३ ॥

काव्य ३५

९

## मांजरीची म्यांव म्यांव

( प्रमाणिका वृत्त )

द्विपाद एक पाहिला, जयास पुच्छ डोकिला ॥
न शृंगही परी जिथें, कसा फिरे जिथें तिथें ॥ १ ॥
विपक्षता तरी उडे, प्रवाल वेंचण्या बुडे ॥
धरातलीं तसा दडे, गिरीशशीर्षही चढे ॥ २ ॥
चराचरासि जिंकितो, शुभाशुभासि धाकतो ॥
उलूक भालु शद्व त्या, करी निशब्द ऊठतां ॥ ३ ॥
असा विचित्र पूतळा, प्रभातिं आडवा अला ॥
सबंध काल भागल्यें, करीं न अन्न लागलें ॥ ४ ॥
पयांश ना मला मिळे, न मूषकांहि पाहिलें ॥
असाचि काळ कंठल्यें, सदा निजांग चाटल्यें ॥ ५ ॥
धरावि एक चीमणी, प्रयोजुनी निजांगणीं ॥
पदांसि ठेवि चोरुनी, न तोंच भुंकते शुनी ॥ ६ ॥
तईंच पाठ उंचवीं, स्वपुच्छ फुल्ल फुलवीं ॥
नितांत रक्षणा करीं, प्रयत्न ते परोपरी ॥ ७ ॥
झुकांडि देउनी निघें, तयां घरांत कीं रिघें ॥
पिलांत एक तें कमी, बघून रूदना क्रमी ॥ ८ ॥
प्रतिध्वनी तरूंतुनी, तदाच येइ ऊठुनी ॥
प्लवंगहातिं सांपडे, अचूक पोर बापडें ॥ ९ ॥
क्षणांत पाजलें करी, क्षणांत सोडलें करी ॥
तयास मायतोतया, वसून उंच फांदिया ॥ १० ॥
गतासु होउनि सुटे, अखेर खालिं आपटे ॥
विपत्तिपूर लोटतो, जरी मनुष्य भेटतो ॥ ११ ॥

असा प्रसाद लाभला, मला विडालिला भला ॥
करून म्यांव म्यांव तें, तुम्हांस नित्य सांगलें ॥ १२ ॥

१०

## नकळे मी मला

चालः—( अतुल तव कृति )

असुनि निकट दिनरजनिं सतत नकळे मी मला ॥ ध्रु० ॥
एक विषया स्मरें, प्राप्त व्हाया झुरें, तोहि घेतां करें,
आवडि न त्याजला ॥ १ ॥
पंचखाद्यें नवीं, नित्य भेदें हवीं, नातरी भोववी,
प्राण करि व्याकुला ॥ २ ॥
बालपणिं प्रौढता, प्रौढपणिं बाल्यता, अन्यस्थितिचारुता,
चाळवी चंचला ॥ ३ ॥
होउनी मोहवश, टाकितों भक्तिरस, सेवितों क्षणिकरस,
विषयपंकांतला ॥ ४ ॥

११

## मी

चालः—( त्यजि भक्तांसाठीं लाज )

मी नित्य निरंजन तें, आनंद रूपचि माझें ॥ ध्रु० ॥
पुरुष वा नव्हे वनिता, जननिही नव्हे जनिता,
ग्रहगणांत जणुं सविता, चैतन्यकेंद्र भवाचें ॥ १ ॥
शिशुपणांत जशि जननी, तरुणास होय तरुणी,
नलिनीस मित्र तरणी, सुखधाम पूर्ण जगाचें ॥ २ ॥

भीषणा मृत्युसमयीं, व्यक्तित्व लया नेई,
अव्यक्त गति देई, नच कालपाउल वाजे ॥ ३ ॥
भूजला तेविं समिरा, आकाश तेज प्रखरा,
मजवांचून नच थारा, हे खास किंकर माझे ॥ ४ ॥
मी कार्य, कर्म, ना कर्ता, मी ज्ञान ज्ञेय ना ज्ञाता,
मी तें तूं तूं मी परता, स्वानंदसागर गर्जे ॥ ५ ॥

## १२

## न्हाणोली-मधुकरी

शार्दूलविक्रीडित

माध्यान्हीं अनवाणि सोडुनि गृहा बाहेर कोठें निघे—
अन्नार्थी म्हणुनी कदन्न मिळण्या झोळी-पळी-पात्र घे।
पायांतें बसती असह्य चटके पाणी निघे लोचना।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ १ ॥

झाली, वेळ असे अजून मग या, पाट्या अशा देखिल्या।
कोठें नीतकुरासवें लघुमुदा ताटांत वाढिन्नल्या।
या वाड्यापुढतीं झडे चवघडा आलापिती सुस्वना।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ २ ॥

पक्कान्नें विविधें करून स्वकरें थाळयामध्यें झांकुनी।
येती हास्यमुखें सुदिव्यवसना सालंकृता कामिनी।
पृच्छा ही करिती कुठें ऋतुमती बैसे त्वरें सांगना।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ ३ ॥

दैवाची करणी अगम्य म्हणुनी या भिक्षुला टाकुनी।
तृप्ती जीस असे तिलाच म्हणती वाढा नवीं वाढणीं।

ज्या प्राप्तीस्तव हर्ष तीस गणतों सांवत्सरीं साजणा।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ ४ ॥

हिंडोनी सदना अनेक रदना दावूनहि ना मिळे।
तें मिष्टान्न पुढें करून पुढतीं सारी हतांवेगळें।
ऐशी ही सुदती कशी गजगती मान्या गमे सन्मना।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ ५ ॥

येती धुंडित भोग सर्व तुजला हे चंद्रबिंबाननें।
माझा भोग परी सदैव फिरवी मातें अळीपाळिनें।
याचें कारण हेंच कां करितसे मी शारदोपासना ?।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ ६ ॥

आहे वर्ण समान रूपहि तसें मी साजिरा गोजिरा।
अंगानें कृश ना तसा कुरुप ना झालों वयें पंधरा।
आहे एक परी खरी विषमता जी दूर कीं होईना।
न्हाणोली मखरीं तरी मधुकरी द्वारीं दिसेना कुणा ॥ ७ ॥

## १३

## शंकासमाधान

चालः—( तेथेंच उभी कीं आले )

कोसळे वीज कां धरणीं ? नभ पोकळ आहे म्हणुनी। समज तूं।
कां भूमि शोषिते पाणी ? ती छिद्रित आहे म्हणुनी। समज तूं।
कां जीभ वदे भलतेनी ? नच हाड तियेसी म्हणुनी। समज तूं।
॥ चाल ॥ हा न्याय, जगाचा होय, धावतें तोय,
उतरणी वरुनी।
उतरणी वरुनी।
आडवें न ज्या ये कोणी ॥ १ ॥

कां रात्र पडे अंधारी ? तो रवी तमा ना सारी । म्हणुनियां ॥
व्योमांत तारका कुठली ? सूर्याची शकलें झालीं । म्हणुनियां ॥
रवितेज भव्य तें कसलें ? त्याहुनी प्रखर ना दिसलें । म्हणुनियां ॥
॥ चाल ॥ तमतेज, काल अणि आज, भाव हे सहज,
जगांतचि जगती ।
जगांतचि जगती ।
सापेक्षपणानें तगती ॥ २ ॥

## १४

## Change is Beauty

क्षणे क्षणे यन्नवतामुपैति
तदेव रूपं रमणीयतायाः

चालः—( अखंड हरि हरि वदा रे )

सुरम्य नश्वर खरेंच सारें, निसर्गनियमचि गमे असा रे ॥ ध्रु० ॥
देवेंद्रचाप पाहिला, विस्तार थोर जाहला,
वर्णीं न उणा राहिला, बघबघतां लोपला कसा रे ? ॥ १ ॥
गंधर्वपुरी देखिली, प्राकार गृहें रेखिलीं,
तीं सत्य कुणी लेखिलीं, वसण्यास कुणा लाभली वदा रे ? ॥२॥
घनतिमिरीं लकलके, चांदणीतेज झकझके,
हिरकणी न तीसह तुके, ती तुटुनी लोपे निकी कशी रे ॥ ३ ॥
प्राचीस प्रभा फांकली, वानें मधुर तान ऐकिली,
कुणि पक्षानें झोंकिली, पसरतांच लय पावली बघा रे ॥ ४ ॥
बालार्कतिरिप भेटली, अति सुखदा मज वाटली,
फिरफिरुनी कवटाळली, झळईत विलिन जाहली गड्या रे ॥५॥

कुंजात पुष्प विकसलें, सौगंध भवातिं दरवळे,
घेण्यास हात वळवळे, परिमळाविणें तें मिळे कसें रे ॥ ६ ॥
वांसरा कास लाभते, दुशि देउन पय शोधितें,
मुख भरुनी तें सांडतें, दुहुं जातां आटतें झणीं रे ॥ ७ ॥

( मग सौंदर्य आहे कशांत ? )

वाहत्या जला माधुरी, वाढत्या तरुस मंजरी,
फूंकितां सूर बासरीं, मनोज्ञता चंचला खरी रे ॥ ८ ॥

१५

## विवाहमंगल ( शा. वि. )

झाली बालदशा कुमारपणही नेलें लया यौवनें ।
पूर्णेंदू शरदीं न तापद परी जेवीं तमा दूर ने ।
आली सुंदरता, सुगात्रि भरलें तारुण्य चेतोहरम् ।
ऐसा जो विधि निर्मिता वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥ १ ॥
स्वर्गंगा त्यजि सत्पदा शिवशिरीं वांछी त्वरें जावया ।
रश्मींचा समुदाय अस्तसमयीं सूर्याप्रती यावया ।
सोडी पूर्वदिशा तरी पुनरपी तीतें रवी स्वीकरी ।
लीलानुग्रही हा हरी वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥ २ ॥
होतां प्राप्त वसंतकाल तरुनां अर्पी वनश्री नवी ।
वर्षा-आगमनें सहर्ष शिखिनां केकारवा शीकवी ।
गर्जोनी थकल्या सुपात्र जलदा सौदामिनीसंगम ।
देई जो विधि तो मुदें वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥ ३ ॥
सूर्यास्तीं क्षितिजा तसें महितला वाटे उदासीनता ।
आकाशीं निघते तदा रिझविते ती तारका तत्वता ।

चंद्राला नसतां द्युति प्रभुपणें मित्राकरें ओपवी ।
ऐसा तो जगदीश या वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥ ४ ॥
चंद्रा शीतलता, नगा कठिणता, इक्षूसहि स्वादुता ।
पुष्पा सुंदरता, उदार पुरुषा निस्सीम दातृत्वता ।
शूरा विक्रमता, नृपा निपुणता, तुष्टी मनःसंयमा ।
तेवीं हीं निगडीत हो वधुवरें, इच्छा धरा उत्तमा ! ॥ ५ ॥

१६

## ऐश्वर्य कुणाचें कोण मिरवितो तोरा

चालः—( अर्पिलें सुमन )

ऐश्वर्य कुणाचें कोण मिरवितो तोरा ॥ ध्रु० ॥
पाहतां मेघ सामोरा, पसरितो मोर निज परा,
नाचे, न वाचे, सूर येइ साजिरा ॥ १ ॥
मधुमास–आगमीं अंकुरती तरुलता ।
मधुसक्त भृंग गुंगतां, पंचमस्वना परभृता,
काढी फुलांच्या वृक्षराजि बैसतां ॥ २ ॥
पूर्णेंदुदर्शनें स्वैर वागते रजनी ।
अंधेरअनुचरा त्यजुनी, तारकादासि सोडुनी,
शैलस्तनांना व्यक्तवी सुहासिनी ॥ ३ ॥
ऐश्वर्य नांदतें सर्वहि नारायणीं ।
परिवेष्टित त्या राहुनी, उचलितो शेष निज फणी,
योगींद्रमाथा छत्ररूप होउनी ॥ ४ ॥

१७

## विधवाविलाप

चालः—( श्रीमंत पतीची राणी )

चतुरानन भूली झाली, देहासि चारुता दिधली ॥ ध्रु० ॥
वैधव्यदशा लिहिलेली, नच भालिं कशी ती दिसली ।
देतांना वर शुभकालीं, द्विजजिव्हा सत्य न वदली ।
क्षण दाउन सौभाग्याचा, थट्टाच मुलीची केली ।
॥ चाल ॥ मंगलमूर्तीसि नमिलें ।
मंगलसूत्रासी धरिलें ।
मंगलीं अमंगल झालें ।
ही रूढिराक्षसी आतां, मम कुंकुमकंकण उचली ॥ १ ॥

जें कुंकुमकंकण रूढी, मज देइ तिनें तें न्यावें ।
त्या मंगलसूत्रासी ही, पतिचिन्हा म्हणुनि त्यजावें ।
परि अलकालंकारांतें, विधिदत्ता कैंवि हरावें ।
मम नासिक कर्णा विंधी रूढीनें कां न भरावें ।
॥ चाल ॥ ही रूढि खरी चामुंडी ।
गतधवा बालिका मुंडी ।
नयविवेक सारा सांडी ।
नच वालि कुणी कैवारी, मुग्धांसी काय मारावें ॥ २ ॥

निर्मुनी कला चंद्राची, बाहूंत राहुच्या देशी ।
सुकुमार कुसुमकलिकेसी, मातींत काय मर्दीशी ।
निखळुनी अंतरिक्षाची, तारका डोहिं डुबवीशी ।
वर देउन नोवरि हातीं, वैधव्य तीव्र टाकीशी ।

॥ चाल ॥ कर ठेउं कुणाचे कंठीं ।
सन्यस्त वृत्तितें कंठीं ।
मृत्यूस सदा उत्कंठीं ।
विधि एक मागणी ऐशी, ही रूढि ह्मणीं तूं नाशी ॥ ३ ॥
संपतां सूर सारंगी, फोडितो कोण बुध चांगी ।
अस्तंगत भास्कर होतां, करि प्रभा नभा नवरंगी ।
आकाशपथें शर जातां, नच कोणि धनुकली भंगी ।
परतीरा नाविक नेतां, डुबविना तरीहि तरंगीं ।
॥ चाल ॥ विधि वस्तूतें निर्मीतो ।
एकेक कार्यि लावीतो ।
हा समज समाजा नेतो ।
गर्तेंत हीन ऱ्हासाच्या, शापितां तूर्ण तन्वंगी ॥ ४ ॥

१८

## मुहूर्त

गजला सारखी

मुहूर्ता काय हो बघतां । सरोनी जाइ बघबघतां ।
अनंता अंतरीं रिघतां । करी जो आत्मपर घाता ॥ १ ॥
प्रभातीं जन्मला हनुमान् । तसा माध्यान्हकालीं राम ।
हरी अस्तासि गुर्गुरला । यामिनीं कृष्ण अवतरला ॥ २ ॥
शुद्ध शुभ खंडुनी काला । अशुभ केल्या कलाविकला ।
समर्पूनी शक्ति सकला । उगाची बाउ उभवीला ॥ ३ ॥
उसाचा चावितां कुटका । चवी तरि देइ तो कटु कां ? ।
वितरि संग्रामिच्या कटकां । यशायश एकची घटका ॥ ४ ॥
मुहूर्तें बांधिती नाले । धबधबा त्याविणें चाले ।
मुहूर्तें बांधिती नौका । जलाचा ठाव तरि घे कां ? ॥ ५ ॥

मुहूर्ता थांबवी कोण ? । मुहूर्ता लांबवी कोण ? ।
मुहूर्ता सत्यता जाण । घडे कार्यास लावून ॥ ६ ॥
अजिंठ्याच्या सुलेण्यांनीं । इजिप्ताच्या मनोऱ्यांनीं ।
ताजमहलीं मरकतांनीं । मुहूर्ता बांधिलें कसुनी ॥ ७ ॥
( तरीपणः— )
असे हा काल अविनाशी । असंख्या वस्तुंना नाशी ।
विनाशी मानवा कैशी । चिराची हाव रे धरिशी ॥ ८ ॥

१९

## शुकोक्ति

चालः—( नाचत ना गगनांत नाथा )

आवरि सायक शूर वीरा, रामाश्रय नच घेइ मारा ॥ ध्रु० ॥
वनकांतेनें, द्विजसंगतिनें, द्यावा तुजसी काय थारा ? ॥ १ ॥
आम्रतरूचा, नवलतिकांचा, तव शरलीलें लाल मुखरा ॥ २ ॥
चंचल सरिता, जल संसरतां, संगम सोत्सुक होइ अधिरा ॥ ३ ॥
तारुण्यमदें, अतिमंद पदें, नाचत केकी दावि नखरा ॥ ४ ॥—
पडसादाला, हरवायाला, कोकिळ चढवी पंचमसुरा ॥ ५ ॥
चंपककलिका, पुष्पवाटिका, मधुसंकेता देति भ्रमरा ॥ ६ ॥
प्रतिबिंबातें, कोणि न भुलतें, अंबे आटप हा पसारा ॥ ७ ॥

२०

## संपत्ती आणि सौंदर्य

चालः—( नऊ दरवाजे खिडकी रे )

धनाश्रयें जें राहिलें, सौंदर्य असें पाहिलें,
तरि परि त्यांचें, मित्रत्वाचें नातें ना तें जाहलें ॥ १ ॥

दस रुपयांची नोट जी, देई सराफ नूतन जी,
दिवसामाजीं, फिरुनी फिरुनी जर्जर होउनि जाय जी ॥ २ ॥
गरिबापोटीं जन्मली, श्रीमंतातें लाभली,
फंदीपतिच्या संसर्गानें सौंदर्यातें मूकली ॥ ३ ॥
संपत्तीनें सक्तिनें, वस्तूंना संपादणें !
सौंदर्याचा परि तो ठेवा निसर्गहातीं राहणें ॥ ४ ॥

## २१

## फुगा

चालः—( मी समजुं तरी काय भुले )

तूं फुगवीं नच फार फुगा फुटतो ॥ ध्रु० ॥
रबराची अति तलम कोथळी, वातें भरतां तर्र जाहली,
अधिक फुंकतां गौप्य प्रगटली, अति सर्वत्रा टाकि, सांगतों ॥१॥
हलका वायू फुग्यांत भरुनी, मुख त्याचें तें बंद करूनी,
सोडुन देतां नभीं वितरुनी, तुटला पतंग कीं खग गमतो ॥ २ ॥
साबणजल भांड्यांत घेउनी, नलिकामार्गें हळुच फुंकुनी,
रंगि सुरंगि भरी फुग्यांनीं, मोदभरें आकाश बाल तो ॥ ३ ॥
लंब वर्तुलाकृतीहि नाना, आकार दिले कसे फुग्यांना,
निर्वात फुगा प्रकाशतांना, आश्चर्य गमे केवि तेवतो ॥ ४ ॥
लहान मोठे फुगे घेउनी, लहान मोठे दंग क्रीडनीं,
कुणी धाडसी फुग्या बिलगुनी, ऊर्ध्वगतीनें नभा लंघितो ॥५॥
फुग्यांत फुगुनी फुगे राहती, पीत निळे आरक्त शोभती,
फुग्यां पाहुनी फुगेहि खुलती, द्विरेफ चोरा फुगा कोंडतो ॥ ६ ॥
फुगे फुगाविले धर्मगुरूंनीं, धराधरांनीं रूढिबलांनीं,
जनपद ज्यांना शिरसा मानी, जो नवमार्गा फार बिचकतो ॥७॥

फुगे फोडिले शास्त्रज्ञांनीं, सुधारकांनीं वीरकवींनीं,
परवशतेची नुरे जाचणी, स्वाभिमान जरि होय प्रगट तो ॥ ८ ॥

आकाशीं अवनीवर असती, पोकळ अथवा भरींव जाती,
रसाळ अथवा शुष्क त्या किती, कोण तयांची गणती करितो ॥

फुगाच धरणी फुगाच तरणी, जलवृष्टी ये फुग्यामधूनी,
भूकंप नव्हे, फुगा फाटुनी, घरदारांना अंत रिचवितो ॥ १० ॥

सूर्यचंद्र कां असे फुगविले, देवाजीनें फुगे सोडिले,
दिवसा रात्रीं भ्रमूं लागले, कूट मुलांचें कोण सोडितो ॥ ११ ॥

## २२

### व्यक्ति ( फटका )

व्यक्ति व्यक्ति जरि अनंत असती एकीसम ती अन्य नसे ।
रंगरूपरसगंधें स्पर्शें व्यक्तिभिन्नता प्रगटतसे ॥ ध्रु० ॥

दोन व्यक्ति जरी समान गमल्या काल तथापि मधें बसे ।
अभिन्न व्यक्ति समकालीं वा एक्यास्थलिं ना नांदतसे ॥

पुष्पगुच्छ कीं द्राक्षघोंस तो एकाकारें रम्य दिसे ।
अधोर्ध्व जागीं दाणे मांडुनी डाळिंबांतिल रांग हंसे ॥

॥ चाल ॥ माधुर्यें तीं जरि सगळीं ।
अधिक उणी नाहींच मुळीं ।
खालीवर बाळें बसलीं ।

एक अहंता अभाव म्हणुनी हर्षविषादा ठाव नसे
व्यक्ति व्यक्ति जरी अनंत असती एकीसम ती अन्य नसे ॥१॥

स्वाभिमान नच राहे ऐसें विधान खोटें कां करिसी ।
समुदायाच्या घटनेसाठीं आत्मार्पण करुं अहर्निशीं ॥

ईशभक्तिची कमाल करुनी
असा मोहरा विरळा निपजे
॥ चाल ॥ तुझा धर्म तूं वळ
आयुष्याच्या जा
पुरे जगाच्या ह्या
स्वधर्मांत मरण्यासि करुन
व्यक्ति व्यक्ति जरि अनंत अ

२३

पौरस्त्य संस्कृती

पळा मुलींनों प
बागुल भिववी
रात्र पळाली, ध
भगणांची द्युति
बघतां भानूच्य
मळवट भरला
रक्तबिंब जिव्हा
शैलरांग ती, दं
विचकुन धांवे
पळा पळा बाग
बागुल हा तो
काळोखाचा ज
गोंडस तुंबा, अ
कटुतर कटुतर
गोडी पदार्थांची

नांव जगामधिं घुमवीतो।
जगत्रया जो उद्धरितो ॥
ख गड्या।
ति घड्या।
फुगड्या।
घे ज्ञान तयाचें सत्य असें।
तीं एकीसम ती अन्य नसे ॥४॥

३

व पाश्चात्य प्रकाश

ळा पळा।
पळा पळा ॥
कें पांगलीं,
जाइ लया।
वलया ॥ १ ॥
आभाळीं।
लाळी ॥
तपंगती।
वायाला।
ल आला ॥ २ ॥
च काळा।
पुतळा ॥
वचित चुंबा,
कारि सगळी।
च गिळी ॥ ३ ॥

वेलींचीं अग्रें वर सरतां मागिल पर्णें मावळती ।
मंदिरशिखरा उंच न्यावया पायाचे पत्थर लपती ॥
द्राक्षघडांतिल वरच्या दाण्यां नीचाचा ने उच्चपदा ।
माधुर्य परि ज्याचें त्याला सूक्ष्मपणानें करि भेदा ॥
॥ चाल ॥ एक मण्याची माळ नव्हे ।
एक तरूचें रान नव्हे ।
एक्या वर्णें काव्य नव्हे ।
अंक एक एकादश व्हाया एकावरती नित्य बसे ।
व्यक्ति व्यक्ति जरि अनंत असती एकीसम ती अन्य नसे ॥२॥

सुग्रण सुंदर घरटीं बांधी उंच उंच झाडांवरती ।
मधमाशांच्या पोळांमध्यें छिद्रें लाखों तीं भरती ॥
सेनेमधले सर्व शिपाई एक्या वेषें कीं नटती ।
जलवर्षावामधील बिंदु सर्व सारखे कीं दिसती ॥
घरटीं, छिद्रें, शिपाइ, बिंदु बाह्याकारें सम सारे ।
अंतर्यामीं एक एक तो स्वतंत्र आहे साचारे ॥
॥ चाल ॥ विशुद्धतेची ती स्थिरता ।
आयुष्याची अस्थिरता ।
अदलाबदल नये करितां ।
ज्याची त्याची विशिष्टता ती सांभाळुनि हा योग असे ।
व्यक्ति व्यक्ति जरि अनंत असती एकीसम ती अन्य नसे ॥३॥

मानवजन्मा येउन कोणी द्रव्योपार्जन तें करिती ।
क्षत्रिय बच्चे स्वातंत्र्यास्तव मारिति किंवा ते मरती ॥
विषयीजन तो इष्कासाठीं जीवितसारा उधळीतो ।
शास्त्रज्ञहि नवनव वस्तूंच्या थांगालागीं मरमरतो ॥

ईशभक्तिची कमाल करुनी नांव जगामधिं घुमवीतो।
असा मोहरा विरळा निपजे जगत्रया जो उद्धरितो ॥
॥ चाल ॥ तुझा धर्म तूं वळख गड्या।
आयुष्याच्या जाति घड्या।
पुरे जगाच्या ह्या फुगड्या।
स्वधर्मांत मरण्यासि करुन घे ज्ञान तयाचें सत्य असें।
व्यक्ति व्यक्ति जरि अनंत असती एकीसम ती अन्य नसे ॥४॥

## २३

## पौरस्त्य संस्कृती व पाश्चात्य प्रकाश

पळा मुलींनों पळा पळा।
बागुल भिववी पळा पळा ॥
रात्र पळाली, धुकें पांगलीं,
भगणांची द्युति जाइ लया।
बघतां भानूच्या वलया ॥ १ ॥

मळवट भरला आभाळीं।
रक्तबिंब जिव्हा लाळी ॥
शैलरांग ती, दंतपंगती।
विचकुन धांवे खायाला।
पळा पळा बागुल आला ॥ २ ॥

बागुल हा तो नच काळा।
काळोखाचा जणुं पुतळा ॥
गोंडस तुंबा, अवचित चुंबा,
कटुतर कटुतर कारि सगळी।
गोडी पदार्थांचीच गिळी ॥ ३ ॥

रात्रीं भूत दिसें भुरकें ।
दिवसा काय न तें फिरके ? ॥
सुंदर वनिता, कनककणी त्या
जारा चोरां मोहविते ।
साधूनांही वाहविते ॥ ४ ॥
लहान असो वा थोर असो ।
कर्पुर अग्नीसंग नसो ॥
त्याच सुवासा, नेइ अशेषा,
नागररीती नच कळते ।
नैसर्गिक शुद्धी मळते ॥ ५ ॥
रविकर शुद्ध परी जळतो ।
कापुस सूर्यमण्यातळीं तो ॥
मंदाकिनिजल, न्हाणित मुरलें,
कोण चाटुनी मुकीला ।
सांगा मजसी हो गेला ? ॥ ६ ॥
आस्तिकबुद्धीला धक्का ।
नव शास्त्रानें जरि ये का ॥
तरि तें टाका, एकच टांका ।
वेळेवरती जरि दिधला ।
धर्मचिराला नच बदला ॥ ७ ॥

२४

## विजयी कोण, मृत्यू कीं मदन ?

चालः—( कान्हा तूं संभाल रे )

मधुमासमधीं, माधविच्या कुंजांत ।
रतिमदन अशी जोडि दिसे झोकांत ॥ १ ॥

फिर फिरुनी ती प्रेमालिंगन देई ।
नच तृप्ति तया अधरासव घेतांही ॥ २ ॥
तो तीस म्हणे कलश सुखाचा भरला ।
नच परवा ती अंतक हा क्षण ठरला ॥ ३ ॥
ती त्यास म्हणे अशिव गिरा कां वदतां ।
सुखशिखरींचा वायु न सहवे आतां ॥ ४ ॥
तो परत म्हणे खचित क्षणीं या जावा ।
हा जीव सखे अक्षय मिळण्या ठेवा ॥ ५ ॥
जपजाप्य अणी तपदान गुणें फळतें ।
ती मुक्ति प्रिये प्रस्तुत कां नच कळते ॥ ६ ॥
ज्या आनंदीं कालाची गति कुंठे ।
ती मुक्तिच वा काय सुगति ना वाटे ॥ ७ ॥
किति काळ असा गेला तो नच कळला ।
निज कांतेच्या करपाशीं सांपडला ॥ ८ ॥
तो पुरुष पडे वीर असुन धरणीला ।
हतदैवाच्या तोडि नये करणीला ॥ ९ ॥
रणकंदनिंही काळ जयासिं न भिडला ।
अति सुखभावें देह विसर्जन घडला ॥ १० ॥
सति आक्रंदे विरह व्याकुल झाली ।
मृतवत् अंतीं भूतलिं लोळण घाली ॥ ११ ॥
त्या उभयांतें नृपदूतांनीं नेलें ।
शयनागारीं दीर्घ उपायां केलें ॥ १२ ॥
सति राज्ञीचा जीव परतुनी आला ।
परि भूप धरी कायम परलोकाला ॥ १३ ॥

त्या महिपतिच्या निधनें शोकीं बुडली ।
तत्‌दीन प्रजा मांडलिकेंही सगळीं ॥ १४ ॥
परि दुःसह ना काळाला तें कांहीं ।
नवमासांचा अवधी चोरुन नेई ॥ १५ ॥
दिन एक पुढें त्या उत्तम नगरीचा ।
युवराजाच्या जन्मोत्सव स्वारीचा ॥ १६ ॥
तो थाट पहाया गगनीं सुर जमले ।
त्या संभारीं मृत्यु-मन्मथ दिसले ॥ १७ ॥
यमधर्मासी मदन करी प्रश्नाला ।
वद वद मित्रा विजय वरी कोणाला ॥ १८ ॥
तूं माधविच्या वेलितळीं ज्या नेशीं ।
तत्पुत्रा कीं मत्कीर्ति यशा या बघशी ? ॥ १९ ॥

२५

## सुखमय संसार

सुख सुख नाहि म्हणशी कां ? ॥ ध्रु० ॥
शेत पशानें पेरुन काढा खंडोवारी मका ॥ १ ॥
भूस्तरभेदिनि निर्झरिणी जी लाजविते स्फटिका ॥ २ ॥
शीतविनाशक तिमिरनिवारक काष्ठीं अग्नि न कां ? ॥ ३ ॥
प्राणापान करी फुप्फुस तें प्राणिलवायु न कां ? ॥ ४ ॥
अंगुठ चोखुनि लाला घोटुनि शिशु मानी चुचुका ॥ ५ ॥
दूरस्थित पति शुभवार्तेनें सस्मितता चिबुका ॥ ६ ॥
सन्मुख सुनमुख पाहतां पावे वरमाया कुतुका ॥ ७ ॥
श्रांतदिनांतीं सदना येतां दुहिता देइ मुका ॥ ८ ॥
रम्य शुभांगी अनुरक्त परी रोषा घे लटका ॥ ९ ॥

सुखजनित अशा दुःखांना तें औषध न मिळे का ? ॥ १० ॥
सुखजलधींतिल मानवमीना असुखाची रड कां ? ॥ ११ ॥

२६

जीवास—

चालः—( चमकली चांदणी चिमुकली )

मन्मानस हंसा राजसा,
कां विषयीं टपसी काकसा ? ॥ ध्रु० ॥

जे विषयजनित बघ भोगही ।
व्यापून राहती ही मही ।
ते प्राप्त कराया धर्महो ।
सोडून बसशि रे भ्याडसा ॥ १ ॥

करि शार्दुल प्रेमाराधना ।
कृषिवलतनयेची याचना ।
ती उरवी नखदंष्ट्राविना ।
त्या केवळ मूषक कीं ससा ॥ २ ॥

जें सूर्यबिंब पाडी जलीं ।
तें तरलपणातें ऊचली ।
परि आदर्शी जे संचली ।
तत्प्रतिमा वमिते तेजसा ॥ ३ ॥

नृपती निजस्वप्नीं दीनता ।
नट नकली वरितो वीरता ।
तें दैन्यहि अथवा शूरता ।
देहास भास कीं मानसा ॥४॥

सोहं हंसाचा नाद घे ।
श्वासोच्छ्वासांतीं जो निघे ।
निःशब्दाकाशीं तूं रिघे ।
चल एकत्वाच्या मानसा ॥ ५ ॥

२७

## वृथारोप

चालः—( लक्ष्मीसम चंचल या )

लक्ष्मी नच चंचल परि आळ तिजवरी ॥ ध्रु० ॥
शिरतां शरिरीं निखिला, उद्यमरति करि शिथिला,
दूषण ये दैवाला, आळस लपुनी बसला,
फिरवी घनवेगाला, पडतां अति भव्य शिला,
शैलाग्रावरुनि सरित्पात्र भीतरीं ॥ १ ॥
रवि वितरि न तिमिराला, अस्तगिरीं विश्रमला,
निशिथिनि होई प्रबला, नाटोपे चंद्राला,
लघुगुरु ताराततिला, उधळी नवरत्नाला,
दौलत जणुं पुरुषाची येइ स्त्रीकरीं ॥ २ ॥
सीता-पांचाळि-उमा, सम समजा नहि ही रमा,
त्यजिती त्या निज सद्मा, टाकी नच ही पद्मा,
रतमाधव पदपद्मा, जाणे जो रिपुछद्मा,
वेषधारि केशवपरि, स्थीर सुंदरी ॥ ३ ॥
बलबुद्धी आढ्यत्वें, धनपद सहजीं मिळतें,
शीलधर्म सुटतां तें, नकळत गळुनी जातें,
निम्नभागिं जल सरतें, समभूमीं जें स्थिरतें,
सृष्टीचा धर्म असा श्री न नाचरी ॥ ४ ॥

वन–विद्या–रूपश्री, यौवनबल–वीरश्री,
समरांगणिं युद्धश्री, तदनंतर विजयश्री,
या सकळां प्रसवे श्री जगदंबा मातुश्री,
शरनिकरां शीघ्र गति लक्ष्य क्षण तरी ॥ ५ ॥

काविळया जग पिवळें, भूमिस्था रवि चाले,
मद्यपि म्हणतो चळले, जन हे लहरी झाले,
जलपृष्टीं लहरिमुळें, प्रतिबिंबित नग हाले,
दुर्जन दे दोष सदा परशिरावरी ॥ ६ ॥ लक्ष्मी० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0019464
REFBK-0019464